## प्रकरण दुसरे

# ग्रामीणता आणि प्रादेशिकता : तात्त्विक विचार

## आणि

# ग्रामीण कादंबरीची पूर्वपीठिका

## प्रास्ताविक

ग्रामीण साहित्य आणि प्रादेशिक साहित्य असा भेद मानावा की मानू नये या विषयी समीक्षकांमध्ये एकमत नाही. आनंद यादव, नागनाथ कोत्तापल्ले, चंद्रकांत बांदिवडेकर, मधु कुलकर्णी, स.शि. भावे, यांनी आपली मते मांडली आहेत त्यांचा आढावा या प्रकरणात घ्यावयाचा आहे.

तसेच ग्रामीण कादंबरीचा प्रारंभ केव्हा झाला आणि तिचा विकास कस-कसा होत गेला याचा आढावाही या प्रकरणात घ्यावयाचा आहे. १९७५ नंतरच्या मराठी ग्रामीण कादंबरीकडे वळण्यापूर्वी वरील दोन मुद्दयांचा विचार होणे गरजेचे आहे.

## ग्रामीणता प्रादेशिकता : मतभेद

प्रादेशिक साहित्य हे ग्रामीण साहित्यापेक्षा व्यापक आणि विस्तृत आहे. प्रादेशिक साहित्यामध्ये ग्रामीण साहित्यही अपेक्षित असते. म्हणून ग्रामीण साहित्य अशी वेगळी संकल्पना न मानता प्रादेशिक साहित्य ही एकच संकल्पना मानावी असे काही समीक्षकांचे मत आहे तर प्रादेशिक साहित्य आणि ग्रामीण साहित्य या दोन्ही प्रवाहात ग्रामीणता हा समान घटक आहे त्यामुळे प्रादेशिक साहित्य अशी संकल्पना न मानता ग्रामीणसाहित्य असा एकच शब्द वापरावा आणि एवढा एकच प्रकार मानावा असे काही समीक्षकांचे मत आहे. एकूण ग्रामीणता आणि प्रादेशिकता या संकल्पना बद्दल परस्पर भिन्न मते प्रसृत आहेत.

ग्रामीण साहित्याचे पुरस्कर्ते साहित्यिक आणि समीक्षक आनंद यादव म्हणतात, " ग्रामीण हा शब्द त्या प्रदेशातील शहरी वाङ्मयाला आपोआप व्यावृत्त करणारा आहे. म्हणून " प्रादेशिक वाङ्मय" असे न म्हणता या सर्वांना मिळून ग्रामीण वाङ्मय असाच शब्द प्रयोग करणे जास्त योग्य वाटते." [१]

पुढे ते म्हणतात, " प्रादेशिक " हा शब्द वापरताना त्यात्या प्रदेशातील " ग्रामीण स्वरूपाचे लोकजीवन असा अर्थ अभिप्रेत असतो. त्यामुळे शेवटी प्रादेशिक कादंबरी ही ग्रामीण कादंबरीच मानावी लागते." [२] यादवांच्या मतानुसार कोणतेही साहित्य विशिष्ट प्रदेशामध्ये घडत असते त्यामुळे प्रादेशिक साहित्याचे वेगळेपण जाणवत नाही म्हणून "=प्रादेशिक साहित्य" हा शब्द टाकून ग्रामीण साहित्य असा शब्द वापरावा आणि शेवटी प्रादेशिक साहित्यात ग्रामीण जीवनाचेच चित्रण असते, या विधानाची पुष्टीही ते आपल्या मताला देतात पण काही अभ्यासकांचे असे मत आहे की आनंद यादवांनी " प्रादेशिक साहित्याला" शिंगे मोडून असे ग्रामीण साहित्यात बसवू नये. ग्रामीण साहित्यापेक्षा प्रादेशिक साहित्याची विस्तृत दृष्टी लक्षात घेवून " प्रादेशिक साहित्य" असा एकच शब्दप्रयोग करावा. अंबादास माडगूळकर आणि सूर्यकांत खांडेकरयांनीही " ग्रामीण मराठी कथा" या आपल्या ग्रंथात आनंद यादव यांच्या मताशी पूरक मत मांडले आहे. ते म्हणतात, " प्रादेशिकता म्हटली की ती ग्रामीण वाङ्मयाला अपरिहार्यपणे जवळ येते. कारण प्रादेशिक म्हणून जी चित्रणे आजवर मराठीत आली आहेत ती सर्व ग्रामविषयक चित्रणे आहेत म्हणूनच सर्व प्रादेशिक वाङ्मयाला ग्रामीण या सदराखाली घेतले तरी त्यात फारशी चूक होणार नाही" [३] तर ना.सी.फडके यांना " प्रादेशिक कादंबरी" अशी स्वतंत्र -"त-हा" मानण्याचे कारण नाही असे वाटते. म्हणजे त्यांना " प्रादेशिक साहित्य" असा स्वतासुभा मान्य नाही ते म्हणतात, " प्रादेशिक कादंबरी" अशी कादंबरीची स्वतंत्र त-हा मानण्याचे वास्तविक कारण नाही ग्रामीण

साहित्याचीच ती एक शाखाआहे. शहरी जीवनाहून खेड्यापाड्यातल्या लोकांचे जीवन वेगळं आहे, आणि त्या जीवनाबद्दलही पुष्कळ लिहिण्यासारखं आहे. ही जी ग्रामीण कथेमागची भूमिका तिच्याच बैठकीवरून प्रादेशिक कादंबरी लिहिली जाऊ लागली."[४] ना.सी. फडके यांना ग्रामीण साहित्य आणि प्रादेशिक साहित्यमागील प्रेरणा एकच आहे असे वाटते. त्यामुळे ते त्या दोहोत भेद मानायला तयार नाहीत. तथापि उपरोक्त दोन्ही साहित्यप्रकारांची प्रेरणा एकच आहे. हे मान्य केले तरी तेवढयावर भेद-अभेदाचा निकाल लावता येत नाही. कारण " प्रेरणा साम्य" असणे हा एक भाग झाला. याशिवाय त्या साहित्याचे स्वरूपही तपासले जावला हवे. या शिवाय फडके आणखी एका मुद्दयावर जोर देतात तो म्हणजे, " प्रादेशिक साहित्य हे ग्रामीण साहित्याचीच एक शाखा आहे" परंतु कोणते साहित्य कोणत्या साहित्याची शाखा आहे यावर सुद्धा भेद-भेदाचा निकाल लावता यावयाचा नाही. कारण कोणताही साहित्यप्रकार हा शाखोपशाखामध्ये निबध्द असतो त्यामुळे त्यांच्या स्वतंत्र रूपाचा विचार करणे आवश्यक असते.

ना. सी. फडक्यांना प्रादेशिक साहित्याचे स्वतंत्रस्थान मान्य नाही ते पाहिले पण त्यापुढेही जाऊन त्यांना एक उपप्रवाह किंवा शाखा म्हणून त्याचे नाविन्यही त्यांना मान्य नाही. ते म्हणतात, " ग्रामीण कथा या नावाचं औचित्य मी समजू शकतो. आणि मान्य करतो. परंतु प्रादेशिक कादंबरी असं नाव कादंबरीचा एक स्वतंत्र प्रकार म्हणून वापरलं जावं यात विचारांचा भोंगळपणा आहे असं मला वाटतं. कारण असं की खरं पाहिलं असता प्रत्येक कादंबरी प्रादेशिकच असते .......तेव्हा " प्रादेशिक कादंबरी" वाटते तितकी नवीन मुळीच नाही अलीकडच्या लेखकांनी हा एक नवाच प्रवाह साहित्यात आणला हा दावा खरा नव्हे."[५] प्रादेशिक साहित्य असं वेगळे नाव मान्य करता येत नाही. हे फडक्यांचे मत एक वेळ ग्राहय धरता येते. पण प्रादेशिक साहित्याच्या नावीन्याबद्दलची त्यांची शंका मात्र ग्राहय धरता येत नाही. कारण त्या हिशोबाने सर्व

वाङ्‍मयप्रकाराचे नावीन्यच काय पण स्वातंत्र्यही अग्राह्य ठरवता येते.

मधु कुलकर्णींचे मत आनंद यादव यांच्या मताशी साम्य दाखवणारे आहे. ग्रामीण साहित्य आणि प्रादेशिक साहित्य यांच्यात किंचितसा फरक आहे बाकी संपूर्ण साम्य आहे असे त्यांना वाटते. ते म्हणतात, " ग्रामीण साहित्य आणि प्रादेशिक साहित्य यामध्ये काहींनी भेद मानलेला आढळतो. परिसर म्हणजेच प्रदेश हे मान्य असल्यास ग्रामीण व प्रादेशिक या दोन्हीही संज्ञा तशा समानधर्मीय आहेत हे मान्य होण्यास हरकत नाही. किंचितसा फरक मानायचाच झाला तर प्रादेशिक ही संज्ञा ग्रामीण संज्ञेपेक्षा व्यापक आहे. असे फार तर म्हणता येईल."[६] मधु कुलकर्णींनी आपल्याला जाणवलेले सत्य मांडले आहे. त्यांच्या मते ग्रामीण-प्रादेशिक या दोन्हीही संज्ञा तशा समानधर्मीय आहेत फरक मानायचा झाल्यास व्याप्ती-अव्याप्तीचा आहे. कुलकर्णींनी कोणत्याही नावाचा हट्ट धरलेला नाही.

ना.सी. फडकेंनी आपले कुतूहल बोलून दाखवताना म्हटले आहे, " का कुणास ठाऊक ग्रामीण हे विशेषण लघुकथेला लावलं जाऊ लागलं आणि " प्रादेशिक" या विशेषणानं मुख्यत्वेकरून कादंबरीचा उल्लेख होऊ लागला"[७] फडक्यांना असे का वाटत असावे याचे कारण शोधायचे झाल्यास मधु कुलकर्णींच्या वरील विधानात सापडते. म्हणजे प्रादेशिक ही संज्ञा ग्रामीण संज्ञेपेक्षा व्यापक आहे हेच त्या मागील कारण असावे.

पण नागनाथ कोत्तापल्ले यांना मात्र या दोन्ही संज्ञा स्वतंत्र आहेत. असे वाटते, त्यांच्या मध्ये काही बाबतीत साम्य आहे हे त्यांना मान्य आहे. पण म्हणून त्या संज्ञा एकच आहेत असे मानने त्यांना मान्य नाही. ते म्हणतात, " प्रदेशिकतेचे ग्रामीणत्वाशी निश्चितच काही बाबतीत साम्य असते, परंतु या दोन्ही संज्ञा एकच आहेत असे मात्र नाही. तसेच या दोन्ही संज्ञानी निर्देशित होणारा

अर्थही सारखाच असतो असेही नाही. ते अर्थ परस्पर समांतर आहेत परंतु एक नव्हेत. कारण प्रादेशिक साहित्य ग्रामजीवनाला ग्रामसंस्कृतीला फारसे महत्त्व देत नाही तर ते महत्त्व देते ते एका विशिष्ट प्रदेशाच्या समग्र टप्प्याला कधी ग्रामजीवन आलेच तर ते स्वतंत्रपणे येत नाही ते येते ते त्या प्रदेशातील समग्र संस्कृतीचा एक भाग म्हणून."[८] म्हणजेच ग्रामीण आणि प्रदेशीक साहित्यात चित्रित होणारे घटक काही प्रमाणात सारखे असले तरी त्यांच्या अविष्कारात मात्र फरक असतो. ग.ना. जोगळेकर यांनी ग्रामीण व प्रादेशिक यात भेद केला आहे. ते म्हणतात, " महाराष्ट्रासारखा मोठा भू प्रदेश अनेक उपभूप्रदेशामध्ये विभागाल गेला आहे. त्यामुळेच कोकण, द. महाराष्ट्र, मध्य महाराष्ट्र खानदेश, माणदेश, बागलाण, विदर्भ, मराठवाडा, आणि महाराष्ट्राचा पूर्वभाग, किंवा गोंडवन असे भौगोलिक दृष्टया पुष्कळ विभाग पडतात. या प्रत्येक प्रदेशातील समाजजीवन सांस्कृतिक जीवन, आचार-विचार आणि परंपरा वेगळ्या आहेत. महाराष्ट्राच्या विविध भागामध्ये असलेल्या आदिवासींचे जीवन त्याहून वेगळे आहे हे सर्व लक्षात न घेता प्रादेशिक जीवन म्हणजे ग्रामीण जीवन असे समीकरण मांडणे विसंगत ठरते."[९]

वरील परस्पर विरोधी मतानुसार ग्रामीण-प्रादेशिक साहित्या-बाबत एक वाक्यता दिसत नाही. त्यामुळे हा प्रश्नही अनुत्तरीतच राहतो.

## ग्रामीण कादंबरीची पूर्वपीठिका

आता मराठी ग्रामीण कादंबरीच्या पूर्वपीठिकेचा थोडक्यात काही महत्त्वाच्या कादंबरीकारांच्या आधारे विचार करु. या

पूर्वपीठिकेमध्ये मराठी ग्रामीण कादंबरीचा उगम आणि तिचा विकास कसा झाला याचा विचार करावयाचा आहे.

इ.स. १९०१ मध्ये प्रकाशीत झालेल्या " पिराजी पाटील " या रा. वि. टिकेकर उर्फ धनुर्धारी यांच्या कादंबरीच्या निमित्ताने मराठी ग्रामीण कादंबरीचा उगम मानला तर इ. स १९०१ ते १९७५ यादरम्यान मराठी ग्रामीण कादंबरीने खूप चढ उतार पाहिल्याचे लक्षात येते. त्यात विशेषत: तिने उपेक्षाच जास्त सहन केली परंतु त्यातूनही तिने आपले अस्तित्व टिकवले. आणि आज त्या उगमाचा एक स्वतंत्र प्रवाह झालेला पहावयास मिळतो. या प्रवाहातून " प्रादेशिक साहित्य" या नावाचा एक वेगळाच उपप्रवाह निर्माण झालेला पहावयास मिळतो. अशा या ग्रामीण कादंबरीचा उगमापासूनचा प्रवास आपणांस प्रामुख्याने महात्मा जोतीराव फुले, धनुर्धारी, कृष्णराव भालेराव, ना.वि.कुलकर्णी, साने गुरूजी, र.वा. दिघे, ग. ल.ठोकळ, विभावरी शिरूरकर, बा.भ. बोरकर, श्री.ना. पेंडसे, व्यंकटेश माडगूळकर, अण्णाभाऊ साठे, उद्धव शेळके, शंकर पाटील, हमीद दलवाई, जयंवत दळवी, रा. रं.बोराडे आनंद यादव, महादेव मोरे या लेखकांच्या निवडक कलाकृतींच्या आधारे पहावयाचा आहे.

महात्मा जोतीराव फुले यांच्या " शेतकऱ्यांचा असूड" या पुस्तकाचा समावेश आपण कादंबरीच्या उद्गमाविषयीच्या परिच्छेदात करत आहोत, त्याची कारणे वेगळी आहेत. विश्वकोशामध्ये या पुस्तकासंबंधी माहिती सांगताना लिहिले आहे, की " श्रमिक बहुजन समाजाच्या आर्थिक अवनतीचे उत्कृष्ट चित्र " शेतकऱ्यांचा असूड" या विस्तृत निबंधामध्ये फुले यांनी रेखाटले आहे....या निबंधामध्ये भारतीय ग्रामोद्योग किंवा कुटिरोद्योग ब्रिटीश साम्राज्यशाहीच्या आर्थिक धोरणाने कसे ढासळले आहेत.याचे हृदयविदारक वर्णन केलेले आहे"[१०] म्हणजे या पुस्तकाचा उल्लेख विस्तृत निबंध म्हणून झालेला आहे. परंतु या निबंधाची भाषा काहीशी लालित्यपूर्ण असल्यामुळे या पुस्तकाच्या विचार ग्रामीण कादंबरी उद्गमाच्या

परिच्छेदात व्हावयास हरकत नाही असे वाटते.

समकालीन समाजवास्तवाशी इमान राखून लेखन करणा-या फुल्यांना कादंबरी लिहावयाची नव्हती परंतु त्यांच्या ठिकाणी असलेल्या जिव्हाळ्यामुळे आणि ख-या अवलोकन आकलनामुळे या लेखनात कादंबरीचे गुण उतरले आहेत. स.गं. मालशे " शेतक-याचा असूड " संबंधी म्हणतात, " शेतक-यांचा असूड " चा नाविन्यपूर्ण भाग म्हणजे शेतक-यांच्या अवनत स्थितीचे वास्तव चित्र, त्या अवनन स्थितीची केलेली मूलग्राही चर्चा आणि ती स्थिती सुधारण्यास्तव सुचविलेली उपाय योजना हा होय. शेतक-यांच्या वास्तव स्थितीचे चित्र रेखाटताना फुले यांनी त्यांच्या हीनदीन गृहस्थितीचे जे वेधक वर्णन केले आहे ते एखाद्या ग्रामीण वास्तववादी कादंबरीला लाजवील इतके प्रत्ययकारी आहे."[११]

5 यानंतर कृष्णराव भालेकर यांच्या बळीबा पाटील या कादंबरीचा विचार करावा लागतो. बळीबा पाटील या कादंबरीचे मूळ शीर्षक बळीबा पाटील आणि १८७७ चा दुष्काळ असे असून तिची निर्मिती खेड्यापाड्यातील लोकांसाठी झालेली आहे. कादंबरी एकूण चार भागात विभागलेली आहे. पहिल्या भागात खेड्यातील जीवनाचे वर्णन आणि बळीबाच्या पाटीलकीचा इतिहास आला आहे. दुस-या भागात त्याचा व त्याच्या कुटुंबियांचा परिचय करुन दिला आहे. तिस-या भागात बळीबाने घेतलेल्या भाईबंदाच्या सभेचे वर्णन आहे. बळीबा व इतरांच्या भाषणातून आपण कोण व ईश्वराने आपणास का ? निर्माण केले आहे ? या विषयी संवादरूप विवेचन आले आहे. चौथ्या भागात बळीबाने जीवन सार्थकी लावण्यासंदर्भात काही उपदेशपर विवेचन केले आहे. म. फुल्यांच्या सत्यधर्मास अनुसरुन केलेले हे विवेचन संवादरूप आहे.

कृष्णराव भालेराव यांनी लिहिलेली " बळीबा पाटील " ही कादंबरी " दीनबंधू " मधून प्रसिद्द झाली. ही कादंबरी १८८८ मध्ये प्रसिद्द झाली असली तरी ती १८७७ मध्येच लिहिली गेली आहे असे सीताराम रायकरांचे प्रतिपादन आहे. रायकरांच्या या विधानानुसार "बळीबा पाटील" ही पहिली मराठी ग्रामीण कादंबरी ठरते, पण " भालेकर:

समग्र वाङ्•मय " ( प्रकाशक, महात्मा फुले समता प्रतिष्ठान ) या ग्रंथाचे संपादक सीताराम रायकर पुढे म्हणतात, " भालेकरांनी आपल्या शेतक-यांच्या स्थितीविषयीचे, त्यांची दुःखे दूर करण्यासाठी काय केले पाहिजे याविषयीचे विचार मांडण्यासाठी पात्रे, संवाद, प्रसंग व ग्रामीण पार्श्वभूमी वापरून प्रचारकी हेतू प्रधान मानून लिहिलेली ही कादंबरी आहे• कदाचित हे लेखन कादंबरी म्हणून झाले नसण्याची शक्यता आहे• म्हणून सीताराम रायकर यांनी या मजकुराचा ऐवज कादंबरी एवढा नसल्यामुळे " बळीबा पाटील " ही कादंबरी मानता येणार नाही असेही म्हटले आहे."[१२] रायकरांच्या या विधानामुळे मराठीतील पहिल्या ग्रामीण कादंबरीच्या संदर्भात संभ्रम निर्माण होऊन ती जबाबदारी धनुर्धारी उर्फ रा• वि• टिकेकर यांनी १९०३ मध्ये प्रकाशित केलेल्या " पिराजी पाटील " या कादंबरीवर येवून पडते•

दुष्काळामुळे भणंग झालेला पिराजी पाटील आपल्या कुटुंबाची व इतर शेतक-यांची कशी वाताहत झाली याची कहाणी सांगतो• तीच कहाणी लेखक आपल्या शब्दात पुन:कथित करतो• तत्कालिन ग्रामव्यवस्था, गावकामगारांचे एकमेकाशी असलेले संबंध शहरी पांढरपेशांची शेतक-याकडे पहाण्याची संकुचित व तुच्छतावादी वृत्ती सरकारी अधिका--यांची लाचखोरी, सरकारी आपल्यासाठी काहीच करत नाही याविषयीची शेतक-यांची चीड इत्यादी अनेकबाबी या कादंबरीत येऊन जातात• विविध विषयावर लेखनी चालवणा-या धनुर्धारी उर्फ रा•वि• टिकेकरांनी " वाईकर भटजी " ( १८९८) आणि " पिराजी पाटील " ( १९०३) या कादंब-या लिहिल्या तथापि त्यांच्या " वाईकर भटजी " या कादंबरीला जितकी लोकप्रियता मिळाली तितकी " पिराजी पाटील " या कादंबरीची मात्र उपेक्षा झाली•

पिराजी गावचा पाटील आहे· आपण गावचे पालक आहोत या भावनेने तो वागतो· गाव दुष्काळाच्या आगीत होरपळून निघतो तेव्हा तो भुकेल्या लोकांच्या मुखात घालण्याचा प्रयत्न करतो· परंतु त्याचे प्रयत्न अपूरे पडतात· दुष्काळ लांबतो· शेवटी लोक गांव सोडू लागतात· अन्नासाठी धर्मांतर करू लागतात· गावाची पार वाताहत होते·

ग्रामीण साहित्य चळवळींच्या अग्रस्थानी असणा-या डॉ· आनंद यादव यांनी आपल्या ग्रामीणता साहित्य आणि वास्तव या आपल्या ग्रंथात " पिराजी पाटील " या कादंबरीच्या संदर्भात " पहिली मराठी ग्रामीण कादंबरी" : पिराजी पाटील हा लेख समाविष्ट केला आहे· त्यामध्ये प्रस्तुत कादंबरीची त्या काळात उपेक्षा का झाली असावी याविषयीची शक्यता व्यक्त करताना ते म्हणतात, " ब्राह्मणवर्गाच्या व परंपरागत धर्माच्या विरोधात जाणा-या साहित्यावर ज्यावेळी कडाडून टीका होत असे··········शेतक-यांची पिळवणूक करणा-या नोकरदार वर्गात त्या काळी प्रामुख्याने ब्राह्मणच असल्याने व त्यांच्या स्वार्थी व क्षुद्र वृत्तीचे परखड दर्शन धनुर्धारींनी कादंबरीत घडविले असल्यामुळे कदाचित तिच्याकडे तत्कालीन जाणकारांचे, वाचकांचे, समीक्षकांचे विद्यापीठात पुस्तके लावणा-या विद्वानांचे दुर्लक्ष झाले असण्याची शक्यता आहे· तो काळ लक्षात घेता हे कारण नाकारता येणे कठीण जाते"[१३]

ग्रामीण जीवन चित्रणाचा पुरस्कार करणारे म्हणून सुरुवातीच्या कलाकृतीत उपरोक्त साहित्य ठळक मानता येते कारण " करमणूक " मधून १८९७ मध्ये हरिभाऊंनी " काळ तर मोठा कठीण आला" ही दीर्घ-कथा लिहिली आहे· या कथेत त्यांनी रामजी धायगुडे या शेतक-यांच्या कुटुंबावर दुष्काळामुळे कोसळलेल्या आपत्तींचे व परिणामी झालेल्या विनाशाचे चित्र रेखाटले आहे· तर बी· सी·गुर्जर यांनी - " द्विपोटी " " भिकार कोकणात" अशा काही कथा लिहिल्या आहेत· शि· म· परांजपे यांच्या " काळ " पत्रात प्रसीध्द झालेल्या " खडी फोडणारीची गोष्ट"

या कथात्मक लेखात त्यांनी दुष्काळात होरपळून निघालेल्या ग्रामीण माणसाचे करुण चित्र रेखाटले आहे. तथापि ग्रामीण जीवन चित्रणाची दखल तितकी गांभिर्याने घेतली गेली नाही.

मराठी साहित्यातून ग्रामीण साहित्याचा वेगळा प्रवाह निघण्या मागील अनेक कारणांपैकी " वैविध्य" हे एक कारण होते. त्यामुळे बहुतेक ग्रामीण कादंबऱ्या या मराठी कादंबरीच्या क्षेत्रात सुस्थापित झाल्यानंतर, लेखकांनी लिहिल्या असाव्यात असे वाटते.

ग्रामीण कादंबरीच्या इतिहासात ना. वि. कुलकर्णींचे नाव घेतल्या शिवाय पुढे जाता येत नाही. त्यांना शेतकरी सृष्टीचे कादंबरीकार म्हणून संबोधले जाते. ना.वि. कुलकर्णी यांनी जीवनानुभवाच्या वेगवेगळ्या वाटा चोखाळण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या प्रतिभेचा तो धर्मच आहे. उदाहरणार्थ- कामगार जीवनाचा वेध घेण्यासाठी " मजूर" ही कादंबरी लिहिली. तर ग्रामजीवनाचा वेध घेण्यासाठी " कसे दिवस जातील" ( १९२५) " शिपाई " ( १९२५) "माणिक" ( १९३१) या कादंबऱ्या लिहिल्या. शिवाय त्यांनी न्याय ( १९२६) संसारात ( कष्टी वडील १९३०) या कादंबऱ्या लिहिल्या.

ना. वि. कुलकर्णींचा ओढा ग्रामीण जीवन चित्रणाकडे होता. त्यामुळेच ते फडक्यांच्या लोकप्रियतेच्या धामधुमीत स्वत:चे वेगळेपण सिध्द करु शकले. फडक्यांच्या तंत्रयुगात फडके तंत्राला टाळून जे साहित्य निर्माण होई त्याची दखल घेतली जात नव्हती वि.स. खांडेकरांसारखे लेखकही या प्रभावातून सुटले नाहीत. अशा काळात ना.वि. कुलकर्णींनी वेगवेगळ्या वाटा चोखाळण्याचा प्रयत्न केला. त्यांच्याबद्दल वि.स. खांडेकर म्हणतात," जे धाडस कोल्हटकर, गडकरी, वा.म. जोशी, फडके यांनी केले नाही ते ना.वि. कुलकर्णी यांनी करुन " नवी दिशा दाखविण्याचा प्रयत्न केला. आणि त्यामुळेच त्यांनी निर्माण केलेल्या नव्या वाटेवर आपणास दिघे, शिरुरकर पेंडसे यांच्यासारखे अव्वल दर्जाचे साहित्य निर्मिती करणारे भेटू शकले हे विसरता येण्यासारखे नाही"१४

ग्रामीण साहित्याच्या या सुरुवातीच्या अळखळत्या वाटचालीतून एका नव्या पोटप्रवाहाचा उगम झाला त्याचे नाव म्हणजे " प्रादेशिक साहित्य" वि·स·सुखटणकरांच्या " सह्याद्रीच्या पायथ्याशी" ( १९३१) या कथासंग्रहाच्या निमित्ताने या प्रवहाचा उगम झाला· या प्रवाहाला स्वतंत्र मानायचे की नाही या बद्दल मतभेद आहेत त्याची चर्चाही आपल्याला याच प्रकरणात करावयाची आहे· याचकाळात वा· म· जोशी, वि· स· खांडेकर, मामा वरेरकर या सारखे शहरी लेखक ग्रामीण जीवनावर लेखन करण्याचा प्रयत्न करत होते·

वा·म· जोशी, वि·स· खांडेकर, मामा वरेरकर हे लेखक ग्रामीण साहित्याकडे वळले त्या मागील कारण गांधीवादी तत्वज्ञानाने आलेले भारावलेपण हे होते· म्हणूनच त्यांनी केलेले ग्रामीण जीवनाचे चित्रण वरवरचे राहिले · साने गुरुजी हे मात्र गांधीजींच्या तत्वज्ञानाने प्रभावित होते तरी ते उथळ आणि वरवरचे ग्रामीण चित्रण करणारे लेखक नव्हते हे त्यांच्या " श्यामची आई " या पुस्तकातून स्पष्ट होते· एवढे असूनही गुरुजींच्या लेखनास वाङ्·मयीन प्रतिष्ठा लाभली नाही· याचे कारण त्यांच्या साहित्याबद्दल समीक्षकात असणारा संभ्रम या बद्दल कुसुमावती देशपांडे आपल्या मराठी कादंबरी - पहिले शतक या ग्रंथात म्हणतात, " पां·स· साने यांची रचना विपुल आहे· त्यांनी लहान मुलांसाठी " गोड गोष्टी " लिहिल्या मोठमोठ्या परकीय कादंब-याची सुटसुटीत व सुबोध रूपांतरे केली· ब रीच स्वतंत्र रचनाही केली· परंतु या रचनेपैकी किती भाग उपदेश प्रधान बालवाङ्·मयात जमा धरावा व किती कादंबरी प्रकारात समाविष्ट व्हावा हा प्रश्न उरतो"[१५] यांच्या श्यामची आई" या पुस्तकाबद्दल रवीन्द्र ठाकूर लिहितात; " हे पुस्तक म्हणजे सुटया-सुटया वाटणा-या परंतु एकमेकाशी गुंफलेल्या कथांची मिळून बनलेली एक कादंबरीच आहे· कोकणातील पालगड, वडवली लाडघर, दापोली, हर्णे ही गावे त्याच्या आसपासचा ग्रामीण परिसर

या कादंबरीतून साकार होतो. या कथेला कोकणी ग्रामजीवनाचे कोंदण लाभले आहे. त्या काळातल्या इतर कुठल्याही पुस्तकातून ग्रामजीवनाचे एवढे अस्सल दर्शन घडत नाही ."[१६] ठाकूरांनी " श्यामची आई" या पुस्तकास कादंबरीचे मूल्य दिले आहे. शिवाय ही कादंबरी त्यांना उत्कृष्ट " ग्रामीण" कादंबरी वाटते.

साने गुरुजींच्या नंतर ग्रामीण साहित्य प्रवाहामध्ये र.वा. दिघे यांनी ठळक असे स्थान निर्माण केले तथापि गुरुजी -दिघे या मध्यावधीत ग.रा. वाळिंबे ( रामतनय ) यांनी " मोहित्याची मंजूळा" ( १९३१ ) " खरा उद्धार" ( १९३६), साखर गोटी ( १९४४ ) " प्रमिलाबेन" ( १९४७ ) व गजाभाऊ या कादंब-या लिहिल्या तर वि.वा. हडप यांनी आपल्या काही कादंब-यातून ग्रामीण चित्रण केले. रा. शा. पाटील यांनी " सीता" ( १९३१) ही कादंबरी लिहून ग्रामोध्दार कसा करता येईल याविषयी काही विचार मांडले ना.ह. आपटे, दा.न.शिखरे, या सर्वांनी ग्रामीण साहित्य इतिहासात दखल घ्यावी असे लेखन केले आहे.

१९४० नंतर र.वा. दिघे यांनी ग्रामीण जीवनाचे चित्रण पडघ्यांना मुजरा करुन न करता स्वतंत्रपणे नव्या जाणीवेने केले. त्यांची ही जाणीव त्यांच्या उद्‌गारातूनच स्पष्ट होते. ते एके ठिकाणी म्हणतात, " मराठी वाङ्‌मयावर संस्कृत, इंग्रजी, बंगाली व फारशी वाङ्‌मयाची छाप पडली आहे. आपल्या नवीन वाङ्‌मयात बुलबुल गुलाबाचे फूलाजवळ गातात, प्रणियिनींच्या अंगावर लिलीची फुले उमलतात, किंवा मुखकमले, प्रफुल्ल होतात. आम्हाला तसे काही दाखवयाचे नाही. महाराष्ट्राचे खरेखुरे देखावे, त्यांतील ख-या व्यक्ती आम्हांला तसे काही दाखवायचे नाही. महाराष्ट्राचे खरेखुरे देखावे, त्यांतील ख-या व्यक्ती आम्हाला रेखाटावयाच्या आहेत. आमच्या खेडेगावातील, प्रणय हा असा आहे. हृदयात घुसला की हृदय फाडल्याशिवाय निघत नाही..."[१७] एवढया जाणीवेने त्यांनी कादंबरी लेखन केल्यामुळेच आनंद यादव यांनी त्यांना " मराठी मातीचा पहिला कादंबरीकार, असे संबोधले आहे. दिघेंनी " पाणकळा " " सराई" " आई आहे शेतात" " पड रे पाण्या", " कार्तिका", या महत्वाच्या

ग्रामीण कादंब-या लिहिल्या त्यांनी आपल्या कादंब-यासाठी " प्रादेशिक असा शब्द कुठेही वापरला नाही पण तत्कालिन समीक्षकांनी त्यांना प्रादेशिक ठरवले. त्यांना प्रादेशिक कादंबरीकार म्हणून संबोधल्यावर वाईट वाटे. तथापि र.वा दिघ्यांच्या निमित्ताने मराठी साहित्याला सापडलेली " ही नव्या सोन्याची खाण" खरोखरीच ग्रामीणता ओलांडून प्रादेशिकतेच्या टप्प्यात पोहोचली होती.

र.वा. दिघे यांच्या धीटपणामुळेच पुढे ग.ल.ठोकळ यांच्या सारखा लेखक त्यांची प्रेरणा घेऊन लिहू लागला. ग.ल.ठोकळ यांच्या " गावगुंड " आणि दिघेंच्या " पाणकळा" या कादंब-यात विलक्षण साम्य आढळते. या बद्दल कुसुमावती देशपांडे म्हणतात, " व्यक्ति-चित्राची आवड, बेछूट भावनांच्या चित्रणाची आवड, ग्रामजीवनाची ओळख व रानवट जीवनाच्या वर्णनाकडील झेप या विशेषांत ठोकळ व दिघे यांच्यामध्ये बरेच साम्य आहे." [१८]

" गावगुंड " चे वातावरण थोडे रांगडे थोडे पांढरपेशी आहे. दिघ्यांच्या " पाणकळा व " सराई " चे दोष टाळून अत्यंत आटोपशीर आणि अटकर बांध्याची ही कादंबरी ठोकळांनी घडविली आहे. राजकीय अंदाधुंदीचा फायदा घेऊन काहींनी दरोडेखोरी सुरु केली. भूमिगतांच्या आणि दरोडेखोरांच्या कथा ऐकण्यात लोकांना रस वाटणे स्वाभाविक होते. अशा काळात " गावगुंडने गुणाजी आणि जयवंत या दोन भावांची रोमांचक कथा सादर केली.

याच काळात श्री.म.माटे आणि वामन चोरघडे यांची कथा घडू लागली होती तर बी. रघुनाथ, बा.सी.मर्ढेकर, वि. द.घाटे, ना.के. महाजन, म.भा.भोसले, यांचे कादंबरी लेखन सुरु झाले होते.

१९५० च्या आसपास दोन-तीन वर्षांत मराठी कादंबरीत नवचैतन्य व नवी जाणीव दिसू लागली. या नव्या जाणीवेचा स्पष्ट अविष्कार म्हणजे विभावरी शिरुरकरांची " बळी " ( १९५०) ही कादंबरी होय. " हिंदोळ्यावर" ( १९३४) " विरलेले स्वप्न" ( १९३५) या कादंब-या लिहून स्त्रियांच्या व्यथावेदना शब्दबद्ध करणा-या विभावरींनी बळी या कादंबरीत गुन्हेगार म्हणून घोषित झालेल्या मांग गारुडी समाजाच्या जीवनाची शोकात्मका वर्णन केली. विभावरींच्या मनात निर्माण झालेल्या या समाजविषयीच्या अपार जिव्हाळ्यातून बळी चे लेखन झाले आहे. मात्र हा जिव्हाळा भाबडा नाही. या समाजात गुन्हेगारी वृत्ती का निर्माण होते याचा शोध घेण्याचा प्रयत्न विभावरींनी केला आहे. दलित साहित्याच्या चळवळीनंतर रुढ झालेल्या अर्थाने बळीला ग्रामीण कादंबरी म्हणता येणार नाही. तथापि या कादंबरीतील व्यक्तिरेखा आणि जीवन-चित्रण ग्रामीणच आहे. म्हणूनच वि.स. खांडेकरांनी बळी या कादंबरीचा समावेश ग्रामीण कादंबरी वाङ्मयात केला आहे.

विभावरी शिरुरकरांच्या नंतर मराठी ग्रामीण कादंबरीच्या इतिहासात ठळकपणे पुढे येणारे नाव म्हणजे श्री.ना. पेंडसे. त्यांनी प्रथम कोकणाच्या राकट पार्श्वभूमीवरच आपल्या अप्रतिम कादंब-या लिहून कोकणाच्या जीवनाच्या वैशिष्टयाला साकार केले व प्रख्यात कादंबरीकार हार्डीप्रमाणे सजीव पार्श्वभूमीवर कथानकाची रचना केली. " हद्दपार "एल्गार" " गारंबीचा बापू " " हत्या" या सुरवातीच्या कादंब-यातील पात्रांची जन्मभूमी व कर्मभूमी म्हणजे हर्णे

बंदराच्या परिसरातील उत्तर कोकणाचा प्रदेश. हा प्रदेश जीवनानुभवाची अपरिहार्यता म्हणून येतो. पेंडशानी साखरपेंडी, दापोली, हर्णे आंजर्ले परिसरातील कोकणाचा निसर्गसमृद्ध प्रदेश तेथील मानवी जीवनासह प्रभावीपणे चित्रित केल्यामुळे प्रादेशिक कादंबरीकार म्हणून त्यांची प्रतिमा निर्माण झाली.
नवकथा घडविणाऱ्या बिनीच्या कथाकारात स्थान मिळविल्यानंतर माडगूळकरांनी कादंबरी लेखनास हात घातला. अनुभवाच्या वेगळेपणामुळे त्यांची कथा समकालीन कथेत उठून दिसली होतीच, दलित जीवन हा त्यांच्या अनेक कथांचा विषय आहे. त्यांची " पुढचं पाऊल " ( १९५० ) ही पहिली कादंबरी दलित कलावंताची कथा वर्णन करते.

त्यांच्या " बनगरवाडी " ( १९५५ ) या कादंबरीने प्रादेशिक कादंबरीचा नवा मानदंड निर्माण केला. प्रादेशिक कादंबरीत निसर्गाश्रीत जीवन जगणाऱ्या मानवसमूहाचे दर्शन घडते असे आपण म्हणू लागलो ते " बनगरवाडी" मुळेच. " पाणकळा " " सराई " " गावगुंड " " गारंबीचा बापू " यांच्या नंतर अवतरलेली " बनगरवाडी " एवढी वेगळी होती की, तिची परंपरा दाखवून देणे अवघड व्हावे. " बनगरवाडी"च्या कलात्म टप्प्याने " पाचोळा " आणि " गोतावळा" च्या शक्यता निर्माण केल्या हे निर्विवाद. " वावटळ " ( १९४६) "कोवळे दिवस " ( १९७९) आणि करुणाष्टक ( १९८२ ) या त्यांच्या कादंबऱ्या आत्मचरित्रात्मक आहेत. हमीद दलवाई यांनी ( १९६५) मध्ये इंधन ही कादंबरी लिहून मराठी वास्तववादी साहित्याला पुष्टी दिली. हमीद दलवाईंना प्रामुख्याने कृतिशील सामाजिक कार्यकर्ता म्हणून ओळखले जाते. ते राष्ट्रीय स्वयंसेवक संघात काम करत होते.

" इंधन " मध्ये राष्ट्रवादी आणि पुरोगामी विचारांनी झपाटलेला एक मुस्लीम तरुण आपले कोकणातले गाव सोडून मुंबईत जातो आणि आजारपणात विश्रांती आवश्यक असते म्हणून तब्बल

पंधरा वर्षांनी गावी येतो. या तरुणाने गावाचे बदललेले रूप, हिंदू-मुस्लीम संबंधात धुसू लागलेली आग, बौध्द, सवर्ण, संबंधातील तणाव आणि या विपरित परिस्थितीतील स्वत:ची असहायता या बाबींचे आणि त्या निमित्ताने घडलेल्या घटनांचे केलेले निवेदन येते. खोती गेली तरी मुस्लीम गुर्मीत आहेत आणि कुणब्यांच्यावर खार खाऊ आहेत. अस्मिता जागृत झालेले बौध्द सवर्णांना जुमानीनासे झाले आहेत. जाती धर्माच्या भिंतीत विभागलेल्या सामाजिक वातावरणात त्याची कुचंबना होते. आपल्या पुरोगामी विचारांमुळे तो मुस्लिमांपासून दुरावला आहे तर धर्माने मुस्लीम असल्यामुळे हिंदूनाही जवळचा वाटत नाही अशी कुचंबनाही या कादंबरीत येते.

हमीद दलवाईंच्या नंतरचे महत्त्वाचे ग्रामीण कादंबरीकार म्हणजे जयंवत दळवी खरे पाहता त्यांना ग्रामीण कादंबरीकार म्हणून फारसे कोणी ओळखत नाही. कारण त्यांचे नाव घेतले की प्रथम त्यांची " चक्र " ही महानगरीय झोपडपट्टी जीवनचित्रण करणारी कादंबरी आठवते. " चक्र " बद्दल उषा हस्तक लिहितात, " चक्रने मराठी कादंबरीला नव्या अनुभवविश्वाची जोड दिली आहे. आणि प्रादेशिकतेची कोंडी फोडली आहे."१९

दळवींनी जसे शहरी मध्यमवर्गीय जीवनाचे चित्रण समर्थपणे केले तसेच विनोदी लेखनही हिरीरीने केले आहे. काही कादंबऱ्यातून कोकणी प्रादेशिक जीवनही अविष्कृत केले.

१९६० नंतरच्या कालखंडामध्ये मराठी ग्रामीण कादंबरीच्या क्षेत्रात अनेक महत्त्वाच्या लेखकांचा उदय झाला. त्यामध्ये अण्णाभाऊ साठे हे एक महत्त्वाचे लेखक होत. अण्णा भाऊ साठे जन्माने दलित असले तरी त्यांनी ग्रामीण साहित्याचीच निर्मिती केली. अण्णा भाऊ साठे जन्माने दलित असले तरी त्यांनी ग्रामीण साहित्याचीच निर्मिती केली. अण्णाभाऊ स्वत:ला ग्रामीण लेखक म्हणवून घेत असत. तथापि त्यांच्या कादंबऱ्यांचे स्वरूप लक्षात घेता त्यांचा ग्रामीण कादंबरीकार म्हणून

विचार करणेच संयुक्तिक ठरते.

गावागावांच्या आणि घराण्यांच्या आपसातील वैराच्या कहाण्या हा त्यांच्या अनेक कादंब-यांचा विषय आहे. ही वैरेकधी प्रतिष्ठेसाठी तर कधी अब्रूसाठी खेळली जातात. त्यामुळे त्यांच्या कादंब-यामध्ये संघर्ष आणि त्यातून उद्भवणा-या नाट्यमय घटनांना साहजिकच प्राधान्य मिळते. अण्णाभाऊंच्या कादंब-यांची रचना अशी रंजनानुकूल आहे. रूपसुंदर नायक, नायिका, प्रणयप्रसंग, रहस्ये, योगायोग हे रंजनाचे सांकेतिक घटक त्यांच्या कादंब-यात येतात.

उद्धव शेळके यांच्या धग ( १९६० ) या कादंबरीमुळे मराठी ग्रामीण कादंबरीत मोलाची भर पडली. किंबहुना मराठी ग्रामीण कादंबरीने धग मुळे प्रवासाची दिशा बदलली. तिचा प्रवास आता वास्तववादी भूमिकेतून होऊ लागला. शेळकेंनी प्रचलित रचनातंत्र झुगारून ग्रामीण वास्तवाचा समर्थ अविष्कार घडविला. धग विषयी म.सु. पाटील लिहितात, " धग " ही कठोर वास्तवाचे कलात्मक रूप अविष्कृत करणारी, मराठीतील पहिली ग्रामीण कादंबरी म्हणता येईल." [२०]

शंकर पाटलांनी ग्रामीण जीवनाचा आणि तेथील माणसांचा वेध घेणारी कथा लिहून मानाचे स्थान मिळविले त्यांनी ग्रामीण परिसरातील माणसांच्या व्यक्तीमत्वाचे पदर न पदर सहजपणे उलघडून दाखविले, पाटील यांनी आपल्या कथालेखनात सतत प्रयोग केले. अशा प्रकारे ग्रामीण कथाकार म्हणून स्थिर झाल्यानंतर शंकर पाटील यांनी टारफुला ( १९६४ ) ही कादंबरी लीहिली.

या कादंबरीत कादंबरी रचनेचे रूढे संकेत झुगारून जीवनानुभवाची मांडणी झाली आहे. येथे व्यक्तींना केंद्रवर्ती स्थान लाभलेले नाही. लेखकाने कथारचनेची गुंतागुंत न करता गाव आणि गावाच्या सत्तेसाठी चालणारा संघर्ष रंगवला आहे. शंकर पाटील यांनी ही कादंबरी लिहून मराठी ग्रामीण कादंबरीत मोलाची भर टाकली आहे.

शंकर पाटील यांच्या नंतर बोराडे-यादव यांची कादंबरी हा साठोत्तर ग्रामीण कादंबरीचा लक्षणीय टप्पा ठरतो· यांची कादंबरी जीवनाशय आणि भाषा या दोहोबाबत ग्रामीण संवेदनशीलतेच्या अधिक निकट गेली· बोराडे यांची पाचोळा( १९७१ ) ग्रामीण बोली भाषेत लिहिली गेलेली मराठीतील पहिली कादंबरी आहे·

" पाचोळा" चे लक्षणीय स्थान मान्य करूनही ती " धग " च्या पावलावर पाऊल ठेवून आकाराला आलेली आहे असे म·सु·पाटील यांनी म्हटले आहे तथापि " धग " प्रमाणे " पाचोळा" ही शिंपी कुटुंबाची कहाणी आहे, एवढेच त्या पलीकडे अधिक साम्य त्यादोहोत नाही·

" पाचोळा" आणि " गोतावळा" या दोन्ही कादंब-या मौज प्रकाशन गृहातर्फे एकाच वर्षी ( १९७१ ) प्रसिध्द झाल्या" पाचोळा" प्रमाणे " गोतावळा" ही लक्षणीय ठरली, "गोतावळा" पूर्वी यादवही ग्रामीण कथाकार म्हणून स्थिर झालेले होतेच· त्यांच्या " इंजिन " या कथेत कृषि संस्कृतीवरील यंत्रसंस्कृतीचे आक्रमण हा विषय येऊन गेलेला होता· तरी अजूनही बरेचसे व्यक्त व्हावयाचे राहून गेले आहे, अशी खुस्खुत्यांना वाटत होती· त्या असमाधानातूनच " गोतावळा " या कादंबरीचे बीज त्यांच्या मनात रुजले· आणि त्यातूनच ही कादंबरी निर्माण झाली·

त्यानंतर कथा आणि कादंबरी या दोन्ही क्षेत्रातलेखन करणारे महादेव मोरे हे मोठ्या ताकदीचे लेखक आहेत·त्यांचे लेखन सातत्याने सुरु असून आतापर्यंत त्यांनी अनेक कथासंग्रहाबरोबर " पाव्हणा" ( १९६६) " एकोणिसावी जात " ( १९६८) " पनोती " ( १९६९) रेत ( १९७१) बळी ( १९७२ ) इ·अनेक कादंब-या लिहिल्या आहे· पांढरपेशी विश्वाच्या कक्षेबाहेरील शेतमजूर, विडीकामगार, ड्रायव्हर, क्लिनर,वेश्या - वेश्यांचे दलाल, जोगते - जोगतिणी, आदी तळागाळातल्या माणसांचे आणि मांग-गारुडी डोंबारी आदी भटक्या विमुक्तांचे जग चित्रित करण्यासाठी मो-यांनी आपली लेखनी झिजवली·

मो-यांना वेगळ्या स्वरूपाच्या जीवनचित्रणाची असोशी असली तरी त्यांनी कुठले प्रयोग केलेले नाहीत. नाही म्हणायला " पाव्हणा" आणि " रेत " या कादंब-या त्यांनी ग्रामीण निवेदन शैलीत लिहिल्या आहेत. ते चित्रित करीत असलेले जग नाविन्यपूर्ण आणि वैचित्र्यपूर्ण खरेच परंतु आपल्या अनुभवविश्वाविषयी अभिनिवेशी वाटावी या स्वरूपाची जाणीव आणि पांढरपेशा समाजाविषयी व त्याने निर्मिलेल्या कलेच्या निकषांविषयी एक प्रकारचा दुस्वास त्याच्या मनात आहे.

अशा प्रकारे आपण १८८० ते १९७५ पर्यंतचा मराठी ग्रामीण कादंबरीचा विचार केला.

## समारोप

गांधीवादाने प्रेरित झालेले ग्रामीण साहित्य, फडकेंच्या तंत्राने प्रभावित झालेले ग्रामीण साहित्य, र.वा.दिघेंनी ग्रामीण कादंबरीला दिलेले स्वतंत्र असे नवे वळण, ग.ल.ठोकळांनी दिघेंच्या वळणाला दिलेली पुष्ठी तर पुढे १९५० नंतर विभावरी शिरूरकरांच्या बळी कादंबरीमुळे मिळालेले वास्तववादी वळण आणि उद्धव शेळकेंनी या वास्तववादाचे बळकटीकरण करून १९६० नंतर गाठलेला लक्षणीय टप्पा अशा विविध वाक्वळणांनी ग्रामीण कादंबरीची पूर्वपीठिका संपन्न असल्याचे आपण पाहिले. अशा प्रकारे ग्रामीण कादंबरीच्या उगमापासून म्हणजे १९१३ पासून १९७५ पर्यंत ग्रामीण कादंबरीने कसा प्रवास केला कोणती वळणे घेतली याचा प्रमुख लेखकांच्या आधारे थोडक्यात आढावा घेतला.

याच प्रवाहात पुढे १९७५ नंतरच्या ग्रामीण कादंबरीचा विचार करताना आनंद पाटील, पुरुषोत्तम बोरकर, बाबाराव मुसळे नागनाथ कोत्तापल्ले राजन गवस इत्यादी लेखकांचा विचार करावा लागतो.

संदर्भ
---


१· यादव, आनंद : ग्रामीण साहित्य: स्वरुप व समस्या, मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे, आवृत्ती पहिली पृ· ६१ /६१·

२· तत्रैव पृ·६६ /६७.

३· माडगूळकर, अंबादास आणि खांडेकर, सूर्यकांत: मराठी ग्रामीण कथा· लेखन वाचन भांडार पुणे, आवृत्ती पहिली, प्रस्तावना पृ· ४४, ४५.

४· फडके, ना· सी.: प्रतिभा विलास, विश्वकर्मा साहित्यालय, आवृत्ती पहिली-१९६६, पृ·१९९.

५· तत्रैव पृ· १९९.

६· कुलकर्णी, मधु : महाराष्ट्र साहित्य पत्रिका, ( ग्रामीण साहित्य विशेषांक ), महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे, जुलै-डिसें· १९८०, पृ·४५,

७· फडके, ना· सी· = प्रतिभा विलास उ·नि·पृ·१९९.

८· कोत्तापल्ले, नागनाथ : ग्रामीण साहित्य: स्वरुप आणि शोध, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, आवृत्ती पहिली १९८५, पृ·१५

९· जोगळेकर, ग·ना· : महाराष्ट्र साहित्य पत्रिका ( ग्रामीण साहित्य विशेषांक ), उ·नि·पृ· ४५-५५ .

१०· जोशी, लक्ष्मणशास्त्री : मराठी विश्वकोश खंड-१०, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ मुंबई, आवृत्ती पहिली १९८१, पृ·९७० ,

११· मालसे, स·ग·: ( मराठी ग्रामीण कादंबरी: रवीन्द्र ठाकूर)
मेहता पब्लिशिंग हाउस पुणे, आवृत्ती पहिली
१९९३, पृ·३०, ३१ वरून उद्धृत·

१२· ठाकूर, रवीन्द्र : मराठी ग्रामीण कादंबरी,
मेहता पब्लिशिंग हाउस पुणे, आवृत्ती
पहिली, १९९३ पृ·३३.

१३· यादव, आनंद : ग्रामीणता: साहित्य आणि वास्तव,
मेहता पब्लिशिंग हाउस पुणे, आवृत्ती पहिली
१९८१ वृ १२१·

१४· खांडेकर वि·स· :(मराठी ग्रामीण कादंबरी: रवीन्द्र ठाकूर )
उ·नि·पृ·४० वरून उद्धृत.

१५· देशपांडे, कुसुमावती : मराठी कादंबरी: पहिले शतक,
मुंबई मराठी साहित्य संघ मुंबई, आवृत्ती
दुसरी, १९७५, पृ·३१२·

१६· ठाकूर,र· ना : मराठी ग्रामीण कादंबरी , उ·नि·पृ·४४

१७· बापट, प्र·वा· गोडबोले ना·वा : मराठी कादंबरी: तंत्र आणि
विकास· व्हीनस प्रकाशन पुणे, आवृत्ती तिसरी
१९७३, पृ·३६४·

१८· देशपांडे,कुसुमावती : मराठी कादंबरी पहिले शतक, उ· नि· पृ· ३३

१९· हस्तक,उषा : कादंबरी आणि मराठी कादंबरी,
साहित्य सेवा प्रकाशन औरंगाबाद, आवृत्ती पहिली,
१९९३, पृ·२६२·

२०· पाटील,म· सु : ( मराठी ग्रामीण कादंबरी : रवीन्द्र ठाकूर)
उ·नि·पृ· ९६


12529
A